**प्रेस नोट दिनांक ३१/०७/२०१९**
**फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे**
**ओला उबेर गाडी मध्ये विसरलेला मोबाईल शोध घेवुन परत दिलेबाबत.**

दि. २७/०७/२०१९ रोजी एन. राजशेखर,वय ४७ वर्षे, रा. ७/१८५, - १, एस. के. पी.टी रोड, आंध्रप्रदेश हे आपले कुटुंबियासमवेत पुणे व महाबळेश्वर येथे फिरण्यासाठी आले असताना ते औंध येथील एका हॉटेलअ मध्ये उतरलेले होते. पुणे येथे वास्तव्यास असताना श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपती याचे दर्शन घेण्याकरीता त्यांनी औध येथुन उबेर गाडी बुक केली व ते तेथुन कुटुंबासह सायंकाळी १८.०० वा. चे सुमारास श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेण्यासाठी मंदिराजवळ आले. मंदिराजवळ असलेल्य गर्दीमुळे ते घाई-गडबडीत गाडीतुन उतरुन दर्शनासाठी मंदिराकडे गेले. त्यावेळी त्यांचा वन प्लस ६ टी कंपनीचा मोबाईल फोन ओला उबेर गाडीतच विसरल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे येथे येवुन मोबाईल आम्ही प्रवास केलेल्या ओला उबेर गाडी मध्ये विसरलेला असल्याचे सांगुन, सदर गाडीचा शोध घेणेबाबत विनंती केली असता, महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती प्रतिक्षा शेडगे, पोलीस शिपाई गौतम किरथकुडवे यांनी तात्काळ ओला उबेर कार्यालयाशी संपर्क साधुन तक्रारदार एन. राजशेखर यांनी बुक केलेल्या ओला उबेर गाडीचा नंबर व त्यावरील ड्रायव्हरची माहिती प्राप्त करुन घेवुन ड्रायव्हरशी संपर्क साधुन विसरलेला मोबाईल फोन किंमत रुपये. २०,०००/- चा हस्तगत करुन, तक्रारदार एन. राजशेखर वय ४७ वर्षे यांचे ताब्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. किशोर नावंदे, यांच्या हस्ते देण्यात आलेला आहे.

वरील नमुद कामगिरी ही श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक प्रतिक्षा शेडगे व पोलीस शिपाई गौतम किरथकुडवे यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे


Vivo V9
Dual Rear Camera